**SET-4**

**Series BVM**

कोड नं.
Code No. **9**

रोल नं.
Roll No.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **7** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **4** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.
- Please check that this question paper contains **7** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **4** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* — *गुण : 100*

*निर्धारित समय : 3 घण्टे* — *अधिकतम अंक : 100*

*Time allowed : 3 hours* — *Maximum Marks : 100*

## विभाग अ

**1.** खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

आयुष्य ही एक सुंदर, सुरेख आणि सुरेल आनंदयात्रा आहे. जन्म आणि मृत्यू ही दोन टोकं आपल्या हातात नसतात. त्याबरोबर येणारे फायदेतोटे मुठीत धरुन ही वाटचाल आपल्याला करायची असते. ह्या दोन टोकांच्या मधली यात्रा आपल्या हातात असते. ह्या वाटचालीत येणारे सगळे कडू-गोड अनुभव, चांगले-वाईट सहप्रवासी, मधेच बसणारे आचके-गचके, वाटेत लागणारे चढ-उतार, ऊन-वारा-पाऊस हे चाखत चाखत आपण पुढे पुढे सरकायचं असतं. त्यातच नियतीनं टाकलेली अनुकूल-प्रतिकूल दानं, अशीच ही वाटचाल आहे.

आयुष्य नुसतं जगून चालत नाही; ते सुंदर करावं लागतं. यशस्वी व्हावं लागतं. आपली अनेक प्रकारची कर्तव्ये पार पाडतानाच हक्क मिळवावे लागतात. मानलं तर ही खूप खडतर रस्सीखेच आहे. योग्य दृष्टीनं आणि प्रगल्भ मनानं विचार करु शकलो तर ती एक छानशी आनंदयात्रा आहे. त्यासाठी अचूक सूर पकडावा लागतो आणि ताल साधावा लागतो, तोल राखावा लागतो. आयुष्य छान जगण्यासाठी निसर्गानं आपल्याला अनेक क्षमता दिलेल्या असतात. अनेक वरदानं आपल्याला मिळालेली असतात. ह्या शस्त्रांच्या आणि अस्त्रांच्या मदतीनं ही लढाई जिंकता येते. त्यातली सर्वात मोठी शक्ती म्हणजे आनंद. आनंदी मन हे आपलं फार मोठं भांडवल असते. त्याच्या जीवावर आपण कितीही मोठी मजल मारु शकतो. मनाचा अभ्यास शतकानुशतकं अनेक लोकं करताहेत. साहित्यिक, संत, तत्त्ववेत्ते, आध्यात्मिकजन, सर्वसामान्य जनता सगळ्यांनी ही निरीक्षणं लिहून ठेवली आहेत.

आपलं शरीर आणि मन ह्यांची एक सांगड असते. दोन्हीची कार्ये एखाद्या यंत्रणेप्रमाणे चालतात. शरीरातल्या सर्व संस्था, गात्रे, चेतना, प्रेरणा हे चालवणारी शक्ती म्हणजे मन. मनाचा निश्चित ठावठिकाणा नाही. पण संचार आणि प्रभाव मात्र सर्वत्र आहे. म्हणजे एक प्रकारचा रिमोट कंट्रोलच म्हणा. सभोवतालची परिस्थिती सारखी पालटत राहते. त्याचं भान ठेवणं, अनुमान काढणं त्याप्रमाणे शरीराची आणि मनाची प्रतिक्रिया देणं हेच ह्या शक्तींचे काम. त्यामुळे क्षणोक्षणी पालटणं आवश्यक असतं. ह्या लवचिकतेबरोबर सगळी फरफट होऊ न देता ठामसुद्धा असावं लागतं. 'वज्रादपि कठोराणि, मृदूनि कुसुमादपि' हे मनाचं रूप असावं.

सगळीकडे संचार करणं, लक्ष ठेवणं, सुधारणा घडवणं, बदल करणं आणि हे सगळं निमिषार्धात. ही सगळी कार्यक्षमता अनेक प्रकारच्या रसायनांच्या माध्यमातून साधली जाते. मनावर होणाऱ्या प्रसंगाप्रमाणे पटापट हे रासायनिक बदल घडतात. अनेक प्रकारची Hormones शरीरातील विविध क्रिया पार पाडत असतात. ह्या सगळ्यांचा प्रधानमंत्री मेंदू असतो आणि मेंदूची रसायनं नियंत्रित करण्याचं काय मन नावाचा राष्ट्रपती करत असतो. सर्व संस्थांचं काम सुरळीत चालू असण्यासाठी सर्व औषधे (Chemicals) अचूक प्रमाणात असावी लागतात.

शरीरातील सर्व क्रिया शांतपणे (Smoothly) चालू असून, मन कुशाग्र, आरामदायक आणि आल्हाददायक असण्याची स्थिती म्हणजेच आनंद ! ह्या स्थितीत शरीराची सर्वप्रगतिशील व कार्यक्षम रसायनं जोमात असतात. आनंदी असणं हा मनाचा मूळ स्थायिभाव. तो तसाच असावा लागतो. अशा अवस्थेत उत्कृष्ट कार्यक्षमता टिकून राहते. शरीरातील सर्व एकमेकांशी संलग्न असलेल्या क्रिया अगदी उत्तम कार्यक्षम राहण्यासाठी शरीर व मन आनंदी असावं लागतं. त्यामुळे शरीराची आवश्यक कार्ये चांगली चालतात.

**प्रश्न :**

(अ) आनंदयात्रेची वाटचाल कशी असते ? *3*

(ब) आयुष्याची आनंदयात्रा होण्यासाठी काय करावे लागते ? *3*

(क) मनाचे वर्णन तुमच्या शब्दांत थोडक्यात लिहा. *2*

(ड) आनंदी असणे हा मनाचा स्थायिभाव कां असावा लागतो ? *1*

(i) सुधारणा घडविण्यासाठी

(ii) उत्कृष्ट कार्यक्षमता टिकून रहाण्यासाठी

(iii) सगळीकडे संचार करण्यासाठी

(iv) यांपैकी काही नाही

(य) मेंदू हा _______ असतो. *1*

(i) राष्ट्रपती

(ii) प्रधानमंत्री

(iii) रिमोट कंट्रोल

(iv) रसायन

## विभाग ब

**2.** खाली दिलेल्या विषयांपैकी ***एका*** विषयावर निबंध लिहा : *15*

(i) स्वच्छता अभियान

(ii) बेरोजगार तरूणाचे मनोगत

(iii) मोबाईलचे वेड

## विभाग क

**3.** (अ) खालीलपैकी कोणत्याही ***पाच*** विधानांमध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून वाक्य पुन्हा लिहा : *15*

(i) सगळे कपडे भिजून चिंब झाले होते. त्याला विलक्षण धाप लागली होती. (संयुक्त वाक्य करा)

(ii) तुम्ही मुंबईकर लेखक किती भाग्यवान् । (विधानार्थी वाक्य करा)

(iii) त्यावेळी माझी वाचाच बंद झाली होती.
(वाक्प्रचाराचा अर्थ वापरून वाक्य पुन्हा लिहा)

(iv) त्यांच्या तालावर पाकोळ्या नाचतात आणि पारवे त्यांची साथ करतात. (मिश्र वाक्य करा)

(v) आता मी तिथे रहाणे योग्य नव्हते. (होकारार्थी वाक्य करा)

(vi) अंगावर काटा येणे या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा.

(vii) त्यांनी स्वीय साहाय्यंकाळा खूण केली. त्याने संपर्कयंत्रणा चालू केली.
(केवल वाक्य बनवा)

(ब) खालील शब्दांचे वचन बदलून लिहा. *2*

(i) यादी

(ii) समारंभ

(क) खालील शब्दांचा क्रिया विशेषणासारखा अर्थपूर्ण वाक्यात वापर करा. *3*

(i) वेग

(ii) काळजी

(iii) भरभर

(ड) खालील वाक्ये सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही **5**) *5*

(i) त्या यंत्रमानवाने बाळा चा ताबा घेतला. (क्रियापद ओळखा)

(ii) आज दुपारनंतर तो घरी येईल. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

(iii) संजय अतिशय हुशार आहे. (विशेष नाम ओळखा)

(iv) सरिता शाळेत जाण्यासाठी निघाली आणि पाऊस आला. (उभयान्वयी अव्यय ओळखा)

(v) शुभदाने त्याला पुस्तक बक्षीस दिले. (सर्वनाम ओळखा)

(vi) सैनिकांच्या शौर्याला आम्ही सलाम करतो. (भाववाचन नाम ओळखा)

(vii) हुशार मुलांचे सर्वत्र कौतुक होते. (विशेषण ओळखा)

## विभाग ड

**4.** (अ) खालील प्रश्नांची उत्तरे गद्यपाठाच्या आधारे प्रत्येकी सुमारे 80 शब्दांत लिहा. (कोणतेही **2**) *10*

(i) लेखिकेने ललिताचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ii) लेखकाने डोगरा जवानाच्या मृत्यूचे केलेले वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

(iii) मुंबईच्या चाळीतील कामगाराच्या नंदनवनाची प्रत्यक्षातील परिस्थिती कशी असते ?

(ब) खालील वाक्यांचे पाठाधारे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही **2**) *10*

(i) 'आनंदी आणि आरामदायी आयुष्य किंवा भरभराटीचे आयुष्य जगायचे असेल तर स्वप्ने पहायला हवीत.'

(ii) 'आणखी थोडा वेळ तो इथं राहिला तर मला वेड लागेल उद्याची गोष्ट दूरच.'

(iii) 'आभार तर मीच मानायचे होते, कारण इतके सुंदर नंदनवन फुलवणे मला बापजन्मात जमले नसते.'

(क) पद्यपाठांच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 80 शब्दांत लिहा. (कोणतेही **2**) *10*

(i) 'बहरतील मळे' या कवितेत कवीने दुष्काळाचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?

(ii) 'या जन्माला फुटे न भाषा' असे कवीने कां म्हटले आहे ?

(iii) 'खांब' या शीर्षकाची समपर्कता थोडक्यात स्पष्ट करा.

(ड) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही **2**) *5*

(i) 'कोटि कोटि असतील शरीरे मनगट अमुचें एक असे'

(ii) नित्य मुलीमुलां शाळेंत घालावें ।। अन्नदान द्यावे विद्यार्थ्यांस ।।

(iii) टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी

(य) खालील प्रश्नांचे उत्तर सविस्तार लिहा. *10*

(i) पैलवान तुकाराम लांडगेचे व्यक्तिचित्र रेखावे.

(ii) बँडचा आवाज ऐकून लेखकाने कोणकोणते अंदाज बांधले ? त्यामागचे खरे कारण कोणते होते ?

(इ) खालील प्रश्नांची दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. *5*

(i) महाजालाला संकेतस्थळ जोडण्याचे ________ हे साधन असते.

(अ) संगणक

(ब) सर्व्हर

(क) रूटर

(ड) मार्कअप

(ii) मुलाखत म्हणजे एकमेकांशी होणारा _________ होय.

(अ) चर्चात्मक संवाद

(ब) सहेतुक संवाद

(क) संभाषणात्मक संवाद

(ड) प्रश्नोत्तररूपी संवाद

(iii) दूरदर्शनवरील बातमीचे लेखन करतात संहितेचे ________ भाग करावे लागतात.

(अ) तीन

(ब) दोन

(क) चार

(ड) सहा

(iv) आकाशवाणी हे माध्यम ________ मध्ये शोधून काढले.

(अ) स. 1921

(ब) स. 1918

(क) स. 1901

(ङ) स. 1927

(v) दूरचित्रवाणीची भाषा ही ________ भाषा असते.

(अ) आलंकारिक

(ब) कॅमेऱ्याची

(क) ध्वनीची

(ड) सामान्यांची